सहपत्र -1

परिशिष्ट-2

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नासिक

**शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद (School Council)**

बैठक क्र. 57

**इतिवृत्त**

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. 57, दि. 12.06.2023 रोजी दुपारी 2.00 ते 3.30 या वेळेत हायब्रीड पध्दतीने आयोजित करण्यात आली. या बैठकीस विद्यापीठातील सदस्य प्रत्यक्ष तर बहिस्थ सदस्य On line उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1. डॉ. कविता साळुंके – | प्रोफेसर,अध्यक्ष व प्र.संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा |
| 2. डॉ. संजिवनी महाले – | प्रोफेसर, सचिव, व सदस्य, शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद |
| 3. डॉ.राम ठकार | प्र.संचालक, सी.आय.क्यु. ए. य.च.म.मुक्त विद्यापीठ,नासिक |
| 4. डॉ. मिना कुटे | माजी प्राचार्य ,पी.व्ही.डी.टी. कॉलेज ऑफ एज्युकेशन मुंबई |
| 5. डॉ.सुलभा दि. देशमुख | प्राचार्य, एस.एस.कॉलेज ऑफ एज्युकेशन, उस्मानाबाद |
| 6. डॉ. अशोक राणे | प्राचार्य, खांदेश एज्यु. सोसा.चे कॉलेज ऑफ एज्युकेशन जळगांव. |
| 7. डॉ. राधिका ईनामदार | प्राचार्य, एस.पी. कॉलेज, पुणे |
| 8. डॉ. सज्जन थूल | प्रोफेसर, मूल्यमापन विभाग |
| 9. डॉ. माधुरी सोनवणे | संचालक, कृषी विद्याशाखा |
| 10. प्रा. विजयकुमार पाईकराव | सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा |
| 11. डॉ. डी. डी. पवार | सहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा |
| 12. डॉ. सुभाष सोनुने | सहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा |
| 13. डॉ. साधना लामतुरे | निमंत्रित सदस्य व सहयोगी सल्लागार,CDS |
| 14. श्री शिवानंद कहाळेकर | निमंत्रित सदस्य व सहयोगी सल्लागार,CDS |
| 15. श्री.ज्ञानेश्वर जाधव | निमंत्रित सदस्य व सहयोगी सल्लागार,CDS |

काही वैयक्तिक अडचणींमुळे खालील सदस्य बैठकीस उपस्थित राहू शकले नाहीत.

| | |
|---|---|
| • डॉ.मंजुलिका श्रीवास्तव | विभाग प्रमुख, इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिर्व्हसिटी, दिल्ली |
| • डॉ.गजानन गुल्हाणे | प्रमुख, पदव्युत्तर विभाग, अमरावती विद्यापीठ, अमरावती |
| • डॉ. सुनंदा मोरे | सदस्य,विज्ञान विद्याशाखा. |
| • कै.डॉ. अभय पाटील | सहाय्यक प्राध्यापक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नासिक

## शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद (School Council)

12.06.2023 बैठक क्र. 57

इतिवृत्त

| क्रमांक | विषय |
|---|---|
| 57. | उपस्थित सदस्यांचे स्वागत |
| 57. 1 | विषय क्र. बी.-1 / एफ-176 / 2023/ 01<br>बैठक क्र. 56 च्या परिषदेचे इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. (सहपत्र १) |
| 57. 2 | विषय क्र. बी.-1 / एफ-176 / 2023/ 02<br>मागील सभेच्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. (सहपत्र २) |
| 57. 3 | विषय क्र. बी.-1 / एफ-176 / 2023/ 03<br>विद्याशाखेतील रिक्त पदांबाबत : बी.एड् शिक्षणक्रमासाठी NCTE नियमानुसार 1500 जागांची 9 पदे ,RCI नियमानुसार विशेष बी.एड.500 जागासाठी 5 पदे ,आणि UGC नियमानुसार MA शिक्षणक्रमासाठी 3 पदे,अशी एकूण 17 पदे अपेक्षीत आहेत. त्यापैकी आजरोजी बी.एड ची 5 पदे, विशेष बी.एड ची 3पदे., अशी एकूण 8 पदे भरलेली आहेत.आणि 9पदे भरणे अपेक्षित आहेत. त्यासंदर्भात तक्ता पुढीलप्रमाणे--- |

| अ. क्र. | शिक्षणक्रम | भरलेली पदे | रिक्तं पदे | भरलेलीची पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|
| 1 | बी.एड. शिक्षणक्रम | 5 | 4<br>• 1-Proffesor<br>• 2- Asso Prof<br>• 1- Asst Prof<br>• (Regular) | • 1-MA आणि अर्थशास्र + भुगोल +Ph.D<br>• 1-MA आणि इतिहास +मराठी + SET+ Ph.D<br>• 1-MA आणि मराठी+ ना.शास्र+ SET<br>• 1-MSc आणि विज्ञान+गणित + SET Ph.D | • 1-MCS/ ME Computer<br>• 1-MA English, M.Ed Or M.A.Edu + NET/SET/ Ph.D<br>• 1-M.A. Hindi. M.Ed Or M.A.Edu,NET/ SET/ Ph.D<br>• 1-M,Com,/M.Sc M.Ed Or M.A.edu +NET/SET/ Ph.D |
| 2 | बी.एड. विशेष | 3 | 2<br>• 1-Asso. Prof<br>• Asst. Prof (Regular) | • 1-VI<br>• 1-H<br>• 1-ID | • 1-HI<br>• 1-VI |
| 3 | एम.ए. शिक्षणशास्र | - | 3<br>• 1-Asso Prof<br>• 2-Asst. Prof (on contract) | - | • 1-Msc/ ME Computor<br>• 1-M.A Eng,MED or M.A.Edu,NET/ |

1·2

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | SET/Ph.D<br>• 1-Msc. any Sub/ MED Or M.A.edu, NET/SET /Ph.D |

उपरोक्त चार्ट चर्चा व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय** : शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील रिक्त पदांबाबत चर्चा करतांना NEP 2020 चा विचार करता विद्याशाखेला आता Online प्रोग्राम व online Implemation कडे जाणे आवश्यक आहे. तसेच MOOC ,स्वयं, OER विकसनाचे काम हाती घेणे अनिवार्य होणार आहे. त्यामुळे असलेल्या कायमस्वरूपी स्टाफ मधील एक प्राध्यापक ICT मध्ये प्रभुत्व असणारी असावी, इग्लीश व हिन्दी विषयाचा सध्या विद्याशाखेत एकही प्राध्यपक नसल्याने त्या विषयाचे प्रत्येकी एक प्राध्यपक आणि विद्याशाखा भविष्यात एकात्मिक शिक्षक –प्रशिक्षण सुरू करू इच्छिते म्हणून एक प्राध्यपक M.Com./M.Sc. ह्या पदव्युत्तर पदवीचा असावा असे स्पष्ट करण्यात आले . **नव्याने भरावयाच्या पदाबाबत तयार केलेल्या उपरोक्त तक्त्यास सभेमार्फत मान्यता देण्यात आली.** व विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली. त्याचबरोबर Professor of Practice संदर्भात महाराष्ट्रातील तज्ज्ञांची विषयनिहाय पेढी करून ऑनलाईन लेक्चर साठी त्यांचाही लाभ विद्यार्थ्यांना द्यावा, असे सूचित करण्यात आले.

57.4 **विषय क्र. बी.-1 / एफ-176 / 2023/ 4**

**शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या अभ्यासकेद्रावरील आशय व्यवस्थापनासाठी LMS system कार्यरत करणेबाबत.**

**टिपणी**- NEP2020 नुसार विद्याशाखेच्या सर्वच शिक्षणक्रमात 40 टक्के आशय Online पद्धतीने घेता येतील. तसेच विद्याशाखेत पुढील वर्षात ऑनलाईन नविन प्रोग्राम विकसनही करण्यात येणार आहे. त्यामुळे सध्या अस्तित्वात असलेल्या व पुढील काळात विकसित होणा-या सर्वच शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेंद्रावर आशय व्यवस्थापनासाठी LMS चा चांगला उपयोग होऊ शकतो. तेव्हा शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या अभ्यासकेद्रावर आशय व्यवस्थापनासाठी LMS system लागू करण्यास मान्यता असावी,चर्चा व मान्यतेसाठी सादर.

**(सहपत्र 3)**

**निर्णय** : शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील शिक्षणक्रमामध्ये LMS system लागू करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. त्यावेळी सदर system चा Access विद्यार्थ्यांप्रमाणे संमंत्रकांनाही दिल्यास संमंत्रण संदर्भात ते त्यांचे विविध Online Lecture upload करू शकतील असे सूचित करून शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील सर्व शिक्षणक्रमाना **LMS system लागू करण्यास मान्यता देण्यात आली व विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.**

57.5 **विषय क्र. बी.-1 / एफ-176 / 2023/ 5**

**शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमात हस्तलिखित संशोधन प्रकल्प स्विकारणेबाबत..**

**टिपणी** : शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाचा अंतर्गत कार्याचा भाग म्हणून प्रवेशित अध्ययनार्थींना एका विषयावर कृतीसंशोधन कार्य करावे लागते. सदरील कृतीसंशोधन कार्याचा अहवाल टंकलिखीत स्वरूपात अभ्यासकेंद्रावर सादर केला जातो. मात्र अभ्यासकेंद्राकडून सदरील कृतीसंशोधन अहवाल कार्याचा फिड बॅक घेतला असता. असे कळाले की, अध्ययनार्थी झेरॉक्स

| | |
|---|---|
| | सेंटर किंवा दुस-या व्यक्तीकडून कृतीसंशोधन अहवाल टंकलिखीत तयार स्वरूपात प्राप्त करून घेतात. त्यामुळे अध्ययनार्थींना सदरील विषयाबाबत पुरेसी माहिती नसते. त्यामुळे कृतीसंशोधन अहवाल हा टंकलिखित स्वरूपात न घेता तो विद्यार्थी स्व- हस्तक्षरात लिहून घेण्यात यावा. चर्चा व मान्यतेसाठी सादर....<br><br>**निर्णय** : शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या संशोधन प्रकल्प अहवाल गुणवत्तेसंदर्भात परिषदेत चर्चा करण्यात आली. त्यात विद्यार्थ्यांना मौखिक परीक्षेला येतांना कच्चे काम घेऊन येण्यास सांगावे, केलेल्या संशोधन अहवालावर आधारित गाईड व विद्यार्थी मिळून एक संशोधन पेपर लिहून LMS वर टाकायला सांगावे, या सुचनेसह **शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमात हस्तलिखित संशोधन प्रकल्प स्वीकारण्यास मान्यता देण्यात आली व विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.** |
| 57.6 | विषय क्र. बी.-1 / एफ-176 / 2023/ 6<br>**एकात्मिक बी.एड् शिक्षणक्रम नियमित पध्दतीने सुरु करणे बाबत..**<br><br>**टिपणी :** NCTE ने एकात्मिक बी.एड् सुरु करणेबाबत Online प्रोसेस मागविली आहे. NCTE दूरस्थ पध्दतीने हा प्रोग्राम कार्यान्वित करणार नाही असे स्पष्ट म्हटले आहे. त्यामुळे य.च.म.मुक्त विद्यापीठाने इग्नो प्रमाणे या विद्यापीठालाही बी.ए. बी.एड., बी.एस्सी बी.एड्. आणि बी.क़ॉम. बी.एड् शिक्षणक्रम विद्यापीठ कॅम्पसमध्ये नियमीतपणे चालवण्यास मान्यता द्यावी असे प्रप्रोजल सादर केले आहे. NCTE ची मान्यता मिळाल्यास उपरोक्त तिन्ही क्षेत्रातील एकात्मिक बी.एड् प्रोग्राम विद्यापीठ मुख्यालयात नियमीत पध्दतीने कार्यन्वित करण्यास मान्यता असावी चर्चा व मान्यतेसाठी सादर..<br><br>**निर्णय : शिक्षणशास्त्र विद्याशाखेत NCTE ने मान्यता दिल्यास नियमित पद्धतीने एकात्मिक बी.एड. (बी.ए. बी.एड., बी.एस्सी बी.एड्. आणि बी.क़ॉम. बी.एड्) शिक्षणक्रम IGNOU च्या धर्तीवर नियमित पद्धतीने कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात आली व विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.** मात्र त्यासाठी विद्यापीठाने १२वी पास विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा घ्यावी असे सूचित करण्यात आले. |
| 57.7 | विषय क्र. बी.-1 / एफ-176 / 2023/ 7<br>**शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील शिक्षणक्रमांच्या शुल्क पुर्नरचनेबाबत...**<br>**टिपणी :** विद्यापीठाच्या धोरणात्मक नियमानुसार पूर्वीच्या शिक्षणक्रम शुल्कात नोंदणी प्रक्रिया व परीक्षा शुल्क नव्याने समाविष्ट करुन शिक्षणक्रमाच्या शुल्कांची पुर्नरचना करणयात आली आहे. सदर तक्ता सहपत्र 4 मध्ये जोडला आहे. चर्चा व मान्यतेसाठी सादर.. **( सहपत्र -4 )**<br><br>**निर्णय :** शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील शिक्षणक्रमाच्या सहपत्र ४ मधील शुल्क पुर्नरचनेला मान्यता देण्यात आली व वित्त समितीपुढे मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली. |

| | |
|---|---|
| 57.8 | **विषय क्र. बी.-1 / एफ-176 / 2023/ 8**<br>**शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील विविध शिक्षणक्रमाच्या माहितीपुस्तिकांना मान्यता मिळणे बाबत..**<br><br>**टिपणी :** शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत कार्यान्वित असलेल्या बी.एड. (सेवातंर्गत शिक्षणक्रम) व इतर पदव्युत्तर पदवी, पदविका, प्रमाणपत्र शिक्षणक्रमाच्या शैक्षणिक वर्षे 2023-24 च्या माहिती पुस्तिका चर्चा व मान्यतेस्तव सादर. ( **सहपत्र** 5)<br><br>**निर्णय** : शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील विविध शिक्षणक्रमाच्या २०२३-२५ तुकडी प्रवेशासाठी तयार करण्यात आलेल्या माहितीपुस्तीकांमध्ये NEP 2020 मुळे काही बदल करावे लागल्यास संचालकांना ते अधिकार देऊन सर्व माहितीपुस्तीकांना मान्यता देण्यात आली. व विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली. |
| 57.9<br>57.9.1 | **विषय क्र. बी.-1 / एफ-176 / 2023/ 9**<br>**ऐनवेळी चे विषय –**<br><br>**शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील मागील दोन वर्षामध्ये प्रवेश न झालेल्या शिक्षणक्रमांची अभ्यासकेंद्र बंद करणेबाबत.**<br><br>**टिपण्णी** :- शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील सर्व शिक्षणक्रमाचे 2021-22 व 2022-23 मधील अभ्यासकेंद्रांचे प्रवेश पाहिले असता, त्यात खूप तफावत आढळते. त्यामुळे मागील दोन वर्षात संबंधित शिक्षणक्रमासाठी एकही प्रवेश न केलेले असे अभ्यासकेंद्र या वर्षापासून बंद करण्यात यावे असे वाटते. चर्चा व निर्णयासाठी सादर..<br><br>**निर्णय** : शिक्षणशास्त्र विद्याशाखेत सुरु असलेल्या सर्व शिक्षणक्रमांच्या अभ्यासकेंद्रांचे दर तीन वर्षांनी Academic आणि Administrative Audit मूल्यमापन समिती कडून Rating Scale आधारे करून जे अभ्यासकेंद्र पात्रता प्राप्त राहतील तेच अभ्यासकेंद्र सुरु ठेवावे असे सुचवून शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील मागील दोन वर्षामध्ये प्रवेश न झालेल्या शिक्षणक्रमांची सर्व अभ्यासकेंद्र २०२३-२५च्या प्रवेशप्रक्रिये पासून बंद करणेस मान्यता देण्यात आली व विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली. |
| 57.9.2 | **NEP 2020 नुसार M.A. Education शिक्षणक्रम संरचना चर्चा व मान्यतेसाठी सादर.**<br>महाराष्ट्र शासनाच्या 09/06/23 रोजी झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे सन 2023 या शैक्षणिक वर्षापासून पदव्यूत्तर पदवी विद्यापीठात व संलग्न महाविद्यालयात सुरू करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे शासन निर्णय क्र.एनईपी.2022/प्र.क्र..09/ विशि-3रिक्तता दिनांक 16/05/2023 त्या परिशिष्ट 1 मध्ये 2 वर्षाच्या एम.ए. शिक्षणक्रमांची सत्रनिहाय मांडणी केलेली आहे.<br>एम.ए शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम 2023 पासून शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राबविण्यासाठी एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम संरचनेची पुनरमांडणी केलेली आहे. ती सहपत्र-6 मध्ये दिलेली आहे. NEP-2020 मार्गदर्शक तत्वानुसार पुनर्रचित एम.ए शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम सुरू करण्यासाठीचा विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर... **(सहपत्र -६)** |

| | |
|---|---|
| | **निर्णय** : NEP-2020 नुसार M.A. Education शिक्षणक्रम संरचनेत काही बदल करावे लागल्यास ते अधिकार संचालकांना देऊन सहपत्र ६ मधील M.A. Education शिक्षणक्रम संरचनेस मान्यता देण्यात आली व विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली. |
| 57.9.3 | **एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमासाठी विशेष शिक्षणातील प्रशिक्षकांना संमंत्रक, परीक्षक आणि संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता देणे बाबत..**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद क्र.56 दि.12/12/2022 च्या बैठकीमध्ये एम.ए. शिक्षणशास्त्र प्रवेश पात्रतेमध्ये बी.एड. विशेष शिक्षण उतीर्ण यास मान्यता दिलेली आहे. त्याचप्रमाणे एनसीटीईने निर्धारित केलेल्या शिक्षक प्रशिक्षकांच्या पाठ्यक्रमाच्या आधारे आरसीआय कडून विशेष शिक्षणातील शिक्षक प्रशिक्षकांचे पाठ्यक्रम निश्चित केले जातात. म्हणून विशेष शिक्षणातील शिक्षक प्रशिक्षकांना एम.ए.शिक्षणशास्त्र संमंत्रक, परीक्षक आणि संशोधन मार्गदर्शक म्हणून कार्य करण्यास विषय, चर्चा व मान्यतेसाठी सादर..<br>**निर्णय** : एम. ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमासाठी विशेष शिक्षणातील प्रशिक्षकांना संमंत्रक, परीक्षक आणि संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता देण्यात आली व विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली. |

प्रा.संजीवनी महाले

सचिव,शिक्षणशास्त्र विद्याशास्त्र विद्याशाखा परीषद

12/6/23

प्रा.कविता साळूंके

अध्यक्ष,शिक्षणशास्त्र विद्याशास्त्र विद्याशाखा परीषद

मा.कुलगुरू ह्यांचे मान्यतेसाठी सविनय सादर......

प्रत-शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिशद सर्व सन्माननीय सदस्य.